# ‘मंदिरातला राम’ उलगडत मेधावीने मैदान मारले!

## ‘लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु’च्या महाअंतिम फेरीत धडक

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** क्षणाक्षणाला उत्कंठा वाढत चालली होती...प्राण कानाशी येऊन थांबले होते...टाळ्यांचा अखंड गजर सुरूच होता...अखेर विजेत्यांच्या नावाची घोषणा झाली अन् आपल्या अमोघ वाणीने ‘मंदिरातला राम’ उलगडणाऱ्या मेधावी जांबकर हिने ‘लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु’च्या विभागीय अंतिम फेरीचे मैदान मारले.

अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या विनय पाटील आणि स्वाती मेश्राम यांनी ‘विराट प्रश्न’ वर प्रकाश टाकत लोकसंख्या वाढीसह देशासमोर आलेल्या विविध प्रश्नांना हात घातला. अनिरुद्ध तळेगावकर आणि अनिकेत दुर्गे याने ‘मंदिरातला राम’ या विषयाचा उलगडा करत उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

**प्रायोजक :** वीणा वर्ल्ड प्रस्तुत ‘लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु’ ही स्पर्धा मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, रत्नागिरी, नागपूर, कोल्हापूर, अशा आठ केंद्रांवर होत आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड असून स्पर्धेचे बँकिंग पार्टनर डोंबिवली नागरी सहकारी बँक हे आहेत. नॉलेज पार्टनर चेतनाज इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रीसर्च हे आहेत.

अंतिम फेरीचे परीक्षण पुण्याच्या एच.व्ही. देसाई महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश राऊत आणि वर्धा येथील नाटय़लेखक-कलावंत रंजना पाठक यांनी केले. पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. धनश्री बोरीकर, लोकसत्ताच्या विदर्भ आवृत्तीचे उपनिवासी संपादक देवेंद्र गावंडे, वितरण विभागाचे उपमहाव्यवस्थापक वीरेंद्र रानडे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बोरीकर म्हणाल्या, मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी निर्भिड लेखणीच्या वृत्तपत्रातून अशा उच्च दर्जाच्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते ही विद्यार्थ्यांसाठी जमेची बाजू आहे. अशा व्यासपीठामधूनच देशाचे नेतृत्व उभे राहणार असल्याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्राथमिक फेरीचे परीक्षक लेखिका सायली लाखे-पिदडी आणि प्राध्यापक डॉ. अमित झपाटे यांचा मान्यवरांच्याहस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अंतिम फेरीच्या परीक्षकांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्व कलेविषयी काही सूचना केल्या. रंजना पाठक यांनी विद्यार्थ्यांनी वाचनावर भर द्यावा असा सल्ला दिला. स्पर्धेचे सूत्रसंचालन नितीन ईश्वरे यांनी केले.



विभागीय अंतिम फेरीमधील स्पर्धक



स्पर्धकाला प्रोत्साहन देणारे सभागृहातील श्रोते.



महाअंतिम फेरीसाठी निवड झालेली मेधावी जांबकर हिचा प्रमाणपत्र देऊन गौरव करताना मुख्य अतिथी प्रा. धनश्री बोरीकर व सोबत परीक्षक.

### विदर्भाचे नेतृत्व करण्याची संधी



गेल्या दोन वर्षांपासून मी या स्पर्धेत सहभागी होत आहे, पण यश मिळत नव्हते. लोकसत्ताने वाचनाची गोडी लावली आणि विषय उलगडत गेले. आज प्रथम पारितोषिक मिळाल्यामुळे मुंबई येथील स्पर्धेत मला विदर्भाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. दडपण आहे, पण त्यासोबत मेहनतीची तयारीही असल्याचे विभागीय फेरीमध्ये प्रथम आलेल्या अमरावती येथील मेधावी जांबकर हिने सांगितले.

प्रथम – मेधावी जांबकर - प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अमरावती

द्वितीय - विनय पाटील - कमला नेहरू कॉलेज, नागपूर

तृतीय- स्वाती मेश्राम - डॉ. आंबेडकर कॉलेज, चंद्रपूर

उत्तेजनार्थ प्रथम -अनिकेत दुर्गे- एसआरएम समाजकार्य महाविद्यालय, चंद्रपूर

उत्तेजनार्थ द्वितीय-अनिरुद्ध तळेगावकर- इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्स, नागपूर

### कस लावणारी स्पर्धा



वक्तृत्व स्पर्धेसाठी वाणी आणि शब्द या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शब्द पाठ करून स्पर्धा जिंकता येत नाहीत. त्यासाठी चिंतन, मनन महत्त्वाचे असून त्यासह विद्यार्थ्यांना वाचनाची खूप आवश्यकता आहे, असे मत परीक्षक डॉ. गणेश राऊत यांनी व्यक्त केले. वर्तमानातील ज्वलंत विषय स्पर्धेत असल्याने स्पर्धा कस लावणारी होती. कला आणि सादरीकरणासोबतच दृष्टिकोन देखील महत्त्वाचा असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

### विचारांना चालना देणारी स्पर्धा



ही विचारांना चालना देणारी स्पर्धा आहे. आज मी केवळ उत्तेजनार्थ पुरस्कार मिळविला असला तरी मला येथून मोठे वैचारिक प्रबोधन मिळाले आहे. यानिमित्ताने अनेक विषयांचा अभ्यासही झाला. पुढील वर्षी आणखी तयारी करणार आहे, असे अनिरुद्ध तळेगावकर याने सांगितले.

### कोण म्हणते तरुणाई भरकटली आहे?



ही वक्तृत्व स्पर्धा अतिशय उच्च पातळीची होती. साधारणपणे अशा स्पर्धा अलीकडच्या काळात दिसून येत नाहीत. अशा स्पर्धा त्यांना मिळाल्या तर उत्कृष्ट वक्ते महाराष्ट्रात तयार होतील. आजचे तरुण हे भरकटलेले आहेत असा होणारा आरोप लोकसत्ता वक्तृत्व स्पर्धेने खोडून काढला आहे, असे परीक्षक रंजना पाठक म्हणाल्या.

### एकपायरी वर चढलो



यंदा मला दुसरे पारितोषिक मिळाल्याने एक पायरी वर चढलो आहे. या गोष्टीचा खूप आनंद आहे. लोकसत्ताने ही संधी उपलब्ध करून देत आमच्यासारख्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण केल्याचे द्वितीय पुरस्कार विजेता विनय पाटील याने सांगितले.

### प्रगल्भता वाढविणारी स्पर्धा



या स्पर्धेचा दर्जा अतिशय वेगळा आहे. या स्पर्धेने वैचारिकप्रगल्भता आणली. वाचन, चिंतन, मनन याची सवय लावली. वृत्तपत्रातील बातम्यांपेक्षाही संपादकीय वाचण्यावर माझा अधिक भर असतो, असे मत चंद्रपूर येथील स्वाती मेश्राम हिने व्यक्त केले.

### विचारांच्या कक्षा रुंदावल्या



नवीन पिढीच्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या आहेत. त्यांची चिंतन क्षमता चांगली आहे. वक्तृत्व महत्त्वाचे आहे आणि हे या स्पर्धेतून जाणवते. या स्पर्धांमधून श्रवणवृत्ती वृद्धिंगत होते, पण दुर्दैवाने श्रोते अशा कार्यक्रमाकडे पाठ फिरवतात, अशी खंत यवतमाळ येथून स्पर्धक मुलीसोबत आलेल्या डॉ. स्वाती जोशी यांनी व्यक्त केली.

### सुटी काढून स्पर्धेला आलो



आपल्या आजूबाजूला जे काही चालू आहे, जी परिस्थिती आहे, त्याची जाण मुलांना आहे. वाचनातून, स्वानुभवातून ते व्यक्त करतात. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या कक्षा रुंदावलेल्या दिसून आल्या. त्यामुळे मी आज कार्यालयातून सुटी काढून केवळ लोकसत्ताची ही वक्तृत्व स्पर्धा ऐकायला आलो, असे हिंगणा येथील मयूर कातोरे यांनी सांगितले.

### लोकसत्ताचे व्यासपीठ कामी आले



तरुणांना हे व्यासपीठ मिळत आहे हे आमच्यासाठी मानाची गोष्ट आहे. विचारांना योग्य दिशेने चालना देण्यासाठी लोकसत्ताचे व्यासपीठ कामी आले आहे. अनेक वर्षांपासून स्पर्धांमध्ये जातो आहे. पण लोकसत्ताच्या स्पर्धेत सहभागी होण्याचा आनंद काही औरच आहे, असे चंद्रपूर येथील अनिकेत दुर्गे याने सांगितले.

# नागपूर विभागातून मेधावी जांबकर प्रथम

लोकसत्ता प्रतिनिधी



**नागपूर :** अमरावतीच्या प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेधावी मकरंद जांबकर हिने 'लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु' स्पर्धेत नागपूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश केला. ही स्पर्धा अमरावती मार्गावरील विनोबा भावे विचार केंद्राच्या सभागृहात शनिवारी पार पडली.

विभागीय अंतिम फेरीचे परीक्षण पुण्याच्या एच.व्ही. देसाई महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. गणेश राऊत आणि नाट्यलेखक, कलावंत रंजना *(पान २ वर)*

***संबंधित वृत्त...५***

लोकसत्ता Sun, 08 March 20
https://epaper.l

# लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु : महाअंतिम सोहळ्यात मेधा पाटकर यांची उपस्थिती

## राज्यातील सर्वोत्तम ८ वक्त्यांमध्ये चुरस

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** विशिष्ट विषयाचे विविध कंगोरे उलगडून दाखवत आपले विचार प्रभावीपणे मांडण्याचे आव्हान पेलणाऱ्या राज्यातील यंदाच्या सर्वोत्तम आठ विद्यार्थी वक्त्यांमधील चुरस 'लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु'च्या महाअंतिम फेरीत १४ मार्चला (शनिवारी) रंगणार आहे. अभ्यासपूर्ण आणि तळमळीने व्यक्त होणाऱ्या या वक्त्यांचे कौतुक करण्यासाठी या सोहळ्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि उत्तम वक्ता म्हणून ओळख असलेल्या मेधा पाटकर उपस्थित राहणार आहेत.

राजकारण असो वा समाजकारण किंवा साहित्य असो वा सांस्कृतिक घडामोडी, भवतालच्या स्पंदनांना समाजमाध्यमांद्वारे *(पान ८ वर)*

- कधी - शनिवार, १४ मार्च.
- वेळ - सायंकाळी ६ वाजता.
- कुठे - मराठा मंडळ सभागृह, केळकर कॉलेजजवळ वासुदेव बळवंत फडके मार्ग, मुलुंड पूर्व.

प्रायोजक - 'वीणा वर्ल्ड' प्रस्तुत 'लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु' ही स्पर्धा मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, रत्नागिरी, नागपूर, कोल्हापूर, अशा आठ केंद्रांवर होणार आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड' असून बँकिंग पार्टनर 'डोंबिवली नागरी सहकारी बँक', नॉलेज पार्टनर 'चेतनाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च' हे आहेत.

### लढवय्या वक्त्याचे विचारसंचित...

मुंबईतल्या रुईया महाविद्यालयातून विज्ञान शाखेची पदवी घेणाऱ्या मेधाताईंची ओळख ही आज सर्वांना लढवय्यी समाज कार्यकर्ती म्हणून आहे. पण विद्यार्थी काळापासून त्यांनी समर्थ वक्ता म्हणून आपला ठसा उमटवला आहे. वक्तृत्वाची जोपासना त्यांनी जाणीवपूर्वक केली. पुण्याची रानडे वादविवाद स्पर्धा असो वा ठाण्याची नी. वो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धा, राज्यातील तेव्हाच्या अनेक मानाच्या वक्तृत्व स्पर्धांमध्ये मेधाताईंनी आपल्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाची मुद्रा उमटवली होती. 'लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु' स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत मेधा पाटकर यांचे संभाषित जाणण्याची संधी विद्यार्थी वक्त्यांना लाभणार आहे.



नागपूर विभागातून मेधावी जांबकर प्रथम

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : अमरावतीच्या प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेधावी मकरंद जांबकर हिने 'लोकसत्ता वक्ता दशसहस्रेषु' स्पर्धेत नागपूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश केला. ही स्पर्धा अमरावती मार्गावरील विनोबा भावे विचार केंद्राच्या सभागृहात शनिवारी पार पडली.

विभागीय अंतिम फेरीचे परीक्षण पुण्याच्या एच.व्ही. देसाई महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. गणेश राऊत आणि नाट्यलेखक, कलावंत रंजना (पान २ वर)

संबंधित वृत्त...५



लोकसत्ता Sun, 08 March 2020
https://epaper.loksatta.com/c/49759947